सकाळ
नागपूर, रविवार,
११ ऑगस्ट २०१३

## संक्षिप्त

# श्री. शिवाजी महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

**चिखली, ता. १० :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या वतीने घेण्यात आलेल्या बी.एस्स.सी. अंतिम वर्षाच्या परीक्षेमध्ये स्थानिक श्री. शिवाजी विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचा निकाल ८१ टक्के इतका लागला आहे. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र आणि सुक्ष्मजीवशास्त्र विषयाचा निकाल १०० टक्के लागला आहे, तसेच गणित विभागाचा ९१ टक्के, परमाणुशास्त्र ९६ टक्के, संगणकशास्त्र ८२ टक्के निकाल लागला आहे. अंतिम वर्षाच्या बी.एस्स.सीच्या निकालामध्ये महाविद्यालयामधुन कुंदन भोंडेकर ८४ टक्के, कु.दीपाली आंबेकर हिला ८२ टक्के गुण प्राप्त झाले आहेत. परमाणुशास्त्र विषयात १७ विद्यार्थी प्राविण्यप्राप्त श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत तर वनस्पतिशास्त्र विभागातील सर्वच्या सर्व विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीमध्ये आले आहेत. पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा यांच्या संयुक्त पुढाकारातून घेण्यात आलेल्या २०१३ पदव्युत्तर प्रवेश परीक्षेमध्ये राष्ट्रीय स्तरावर नीलेश शेळके ८ वा आणि अजय भोसले ११ वा मेरीट आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.बी.भुसारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.